# शासकीय तंत्रनिकेतन, अहिल्यानगर

**बुरुडगांव रोड, अहिल्यानगर 414001, पत्रपेटी क्र. 71**

**दुरध्वनी क्रमांक व फॅक्स क्र. 0241-2346192**

Website- www.gpnagar.ac.in E-mail-office.gpahmednagar@dtemaharashtra.gov.in


जा.क्र. शातंनिअ/TPO/2026/ 1333 दिनांक:-18 JUN 2026

## परिपत्रक

विषय: सन २०२६-२७ करीता उच्च शिक्षण विभागांतर्गत सहा प्रशिक्षण केंद्रे तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील प्रशिक्षण केंद्रासाठी आयोजीत केलेल्या एकत्रित सामाईक प्रवेश परीक्षेची माहिती संस्थेतील विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत..

संदर्भ : १. सचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC), मुंबई यांचे पत्र क्र. एसआएसी/२०२६-२७/सीईटी/जाहिरात/३६८, दि.२७.०५.२०२६

२. मा. सहसंचालक विभागीय तंत्रशिक्षणं कार्यालय यांचे पत्र क्र. १२१८, दि. ०९.०६.२०२६

उपरोक्त विषयानुसार संदर्भाधीन पत्रान्वये,राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई यांनी राज्यातील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) परीक्षेत मराठी विद्‌यार्थ्यांचा टक्का वाढावा याकरीता संचालनालयातील अधिनस्त असलेल्या शासकीय / अशासकीय महाविद्‌यालयांतील विद्‌यार्थ्यांना नागरी सेवा पुर्व परीक्षा २०२६-२७ साठीची सामाईक प्रवेश परीक्षेची जाहिरात विभागातील महाविद्‌यालयातील शिकणाऱ्या सर्व विद्‌यार्थ्यांना निदर्शनास आणुन देण्याबाबत विभागीय स्तरावरून आदेशीत करण्याकरिता सुचित केले आहे.

त्याअनुषंगाने सर्व विभागप्रमुखांना कळविण्यात येते की, केंद्रीय लोकसेवा आयोगांच्या (युपीएससी) परीक्षेत मराठी विद्‌यार्थ्यांचा टक्का वाढावा याकरीता आपल्या विभागाच्या विद्‌यार्थ्यांमध्ये नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२६-२७ साठीची सामाईक प्रवेश परीक्षेची जाहिरात निदर्शनास आणुन देण्यात यावी जेणेकरून सद्‌यस्थितीत किवा भविष्यात आपले विद्‌यार्थी प्रशिक्षणास सहभाग नोंदवू शकतात. अधिक माहितीकरिता विद्‌यार्थ्यांनी https://siac.org.in/ या संकेतस्थळाला भेट द्‌यावी.

प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन अहिल्यानगर

सोबत - संदर्भीय नमूद पत्र, जाहिरात

प्रत:- सर्व विभागप्रमुख CE,EJ,IS,ME,PG,CO,CM,EE, SCIENCE

- संस्थेच्या संकेतस्थळावर अपलोड करावे

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण विभाग आयोजित
राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई (SIAC) व्दारे घेण्यात
येणाऱ्या नागरी सेवा पूर्व परीक्षा प्रशिक्षण २०२६ करिता
**सामायिक प्रवेश परीक्षा (CET)-२०२६-२७**

क्रमांक-एसआयएसी/२०२६-२७/सीईटी/सूचना/३८० दिनांक- ०४.०६.२०२६ ०३

उच्च शिक्षण विभागांतर्गत राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC), मुंबई, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजी नगर, अमरावती व नागपूर, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) संचलित डॉ.आंबेडकर स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित सावित्रीबाई फुले अकादमी पुणे इ. संस्थांमार्फत केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२७ साठी पूर्ण वेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्याकरिता सामायिक प्रवेश परीक्षेचे (Offline Mode) **आयोजन सुधारित परीक्षा दि.०२.०८.२०२६ रोजी करण्यात येत आहे.**

**नागरी सेवा पूर्व परीक्षा प्रशिक्षण २०२६ प्रवेश प्रक्रियेचे मुदतवाढ वेळापत्रक:-**

ऑनलाईन अर्ज सुरूवात दिनांक:- ०१.०६.२०२६ ते ३०.०६.२०२६

परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक :- ०२.०७.२०२६ पर्यंत

प्रवेश परीक्षा दिनांक :- ०२.०८.२०२६ (Offline Mode)

**टिप-**

१. विद्यार्थ्यांचे प्रवेश हे लेखी परीक्षा आणि मुलाखतीतील गुणांच्या आधारे ठरवले जाणार असल्यान मुलाखतीचे वेळापत्रक परीक्षेनंतर जाहीर केले जाईल.

२. सामायिक प्रवेश परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश पोर्टलवर लॉग इन करून त्यांच्या पसंतीचे प्रशिक्षण केंद्र प्रवेशासाठी निवडावे.

३. प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना कोणतीही माहिती वैयक्तिकरित्या उपलब्ध करून दिली जाणार नाही. प्रवेश प्रक्रियेबद्दलची सर्व माहिती SIAC च्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाईल.

सविस्तर जाहिरात, परीक्षेचा अभ्यासक्रम, पात्रता, ऑनलाईन अर्ज भरण्याविषयी सूचना व इतर माहिती www.siac.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

दिनांक:-०४.०६.२०२६
स्थळ:- मुंबई

Patole
**(डॉ. भावना पाटोळे)**
**संचालक,**
राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई
तथा समन्वयक, सामायिक प्रवेश परीक्षा

पृष्ठांकन क्र.तंशि/विकाना/तांशा/२०२६/ 1918
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक
दिनांक 9 JUN 2026

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित,
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक विभाग.

२/- उपरोक्त संस्थेतील प्राचार्यांना कळविण्यात येते की, संचालनालयाच्या पत्राचे अवलोकन करावे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) परीक्षेत मराठी विदयार्थ्यांचा टक्का वाढावा या करिता आयोजित सन २०२६-२७ साठीची सामाईक प्रवेश परीक्षेची जाहिरात आपल्या स्तरावरुन आपल्या संस्थेत शिकत असलेल्या सर्व तांत्रिक व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विदयार्थ्यांना परिपत्रकाव्दारे निदर्शनास आणुन दयावे. तसेच सदर प्रशिक्षणास सहभाग नोंदविण्यासाठी विदयार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात यावे. सोबत संचालनालयाचे पत्र जोडण्यात येत आहे.

(डॉ.गोरक्ष विठोबा गर्जे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक

प्रत- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रशिक्षण व आस्था. अधिकारि

पत्रातील निर्देशानुसार कार्यवाही करावी.

15/6/26

15/6/26

शासकिय तंत्रनिकेतन
अहमदनगर
15 JUN 2026
आवक क्र. 762